# आकाशवाणी, पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातम्या
# सकाळी 7 वाजून 10 मि.

## दिनांक: 04.12.2021 वार: शुक्रवार

---

**कोविड-19 विरुद्ध प्रतिबंधक लसीच्या 150 कोटींहून अधिक मात्रा पूर्ण करण्याच्या दिशेनं देश अग्रेसर आहे. दरम्यान, कोरोनाचा नवा प्रकार सापडल्यामुळे चिंता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर आम्ही श्रोत्यांना आवाहन करत आहो की शक्य तितक्या लवकर लसींच्या दोन्ही मात्रा पूर्ण कराव्या आणि इतरांनाही लस घेण्यासाठी प्रोत्साहन द्यावं. मुखपट्टी, सामाजिक ठिकाणी सुरक्षित अंतर, हात आणि चेहऱ्याची स्वच्छता या तीन सोप्या उपायांचं पालन करा. कोविडसंबंधी कोणतीही माहिती आणि मार्गदर्शनासाठी राष्ट्रीय हेल्पलाईन क्रमांक 011- 23 978 046 आणि 1075 या क्रमांकांवर संपर्क साधावा.**

---

ठळक बातम्या,

दिव्यांगजनांच्या सक्षमीकरणासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्याचा राष्ट्रपतींच्या हस्ते गौरव; राज्यातील 10 जणांचा समावेश

94 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं नाशिकच्या कुसुमाग्रज नगरीत उद्घाटन

विज्ञान साहित्याच्या बाततीत मराठीचं अपूर्णत्व जाणवत असल्याची संमेलनाध्यक्ष डॉ जयंत नारळीकर यांची खंत

कामावर येऊ इच्छिणाऱ्या संपकरी एसटी कर्मचाऱ्यांना अडवणाऱ्यांवर कठोर कारवाईचा राज्य सरकारचा निर्णय

आणि

न्यूझीलंड विरुद्धच्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या पहिल्या दिवसअखेर भारताच्या 4 गडी बाद 221 धावा / मयांक अगरवालची शतकी खेळी

**राष्ट्रपती**

देशातील दिव्यांगजनांच्या विकासासाठी सरकार कटिबद्ध असून त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, असं राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी म्हटलं आहे. आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिनानिमित्त काल नवी दिल्ली इथं दिव्यांगजनांच्या सक्षमीकरणासाठी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल राष्ट्रीय पुरस्कारांचं वितरण राष्ट्रपतींच्या हस्ते करण्यात आलं. त्यावेळी ते बोलत होते.या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या व्यक्ती, संस्था, संघटना, राज्यं आणि जिल्ह्यांना राष्ट्रपतींनी हे पुरस्कार प्रदान केले.या पुरस्कार विजेत्यांमध्ये राज्यातील 10 जणांचा समावेश आहे. त्यामध्ये कोल्हापूर जिल्ह्याच्या करवीर तालुक्यातील उचगावचे देवदत्त माने,

इचलकरंजीचे प्रथमेश दाते, नागपूरचे राजेश असुदानी,मुंबईच्या नेहा पावसकर आणि  निकीता राऊत, मूळच्या नागपूरच्या आणि सध्या दिल्लीत स्थायिक देवांशी जोशी, औरंगाबाद इथले सागर बडवे, लातूरच्या प्राध्यापक डॉक्टर प्रीती पोहेकर यांचा समावेश आहे.कोल्हापूरच्या वैष्णवी सुतार यांना सर्वोत्कृष्ट राष्ट्रीय दिव्यांग क्रीडापटूचा पुरस्कार तर दिव्यागांसाठी कार्य करणाऱ्या सर्वोत्तम व्यक्तीचा पुरस्कार पुण्याच्या वानवडी इथल्या सकिना बेदी यांना प्रदान करण्यात आला. दिव्यागांसाठी सुगम्य वातावरण निर्मिती करणाऱ्या सरकारी संस्थांच्या श्रेणीत नाशिक सार्वजनिक बांधकाम विभागाला पुरस्कार देऊन गौरविण्यात आलं.दिव्यांग  दिनानिमित्त काल राज्यातही विविध कार्यक्रम झाले.उस्मानाबाद  नगर परिषदेच्या वतीने उस्मानाबाद शहरातील नोंदणीकृत दिव्यांग  बांधवांसाठी 22 लाख 90 हजार रुपयांच्या निधीचं वाटप करण्यात आलं.

**संसद लोकसभा**

पारदर्शकता आणि विश्वासार्हता हा केंद्र सरकारचा पाया असल्याचं सांगत देशात कोविड19 च्या दुसऱ्या लाटेत ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे अनेक नागरिकांना जीव गमवावा लागल्याचा विरोधकांचा आरोप केंद्रीय आरोग्यमंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांनी काल लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात झालेल्या चर्चेदरम्यान फेटाळला. दुसऱ्या लाटेच्या काळात देशाच्या ऑक्सिजन उत्पादन क्षमता आणि संबंधित व्यवस्थेत मोठी वाढ झाली. देशात जिल्हानिहाय 3040 ऑक्सिजन निर्मिती प्रकल्प उभारण्यात आले, असंही मांडवीय यांनी यावेळी नमूद केलं.

**तोमर / गोयल**

पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत देशातील 11 कोटी 50 लाख शेतकऱ्यांना आत्तापर्यंत 1 लाख 60 हजार कोटी रुपयांचं वाटप करण्यात आलं आहे, अशी माहिती केंद्रीय कृषिमंत्री नरेंद्रसिंह तोमर यांनी दिली. तर देशभरात धान खरेदी सरकारी निकष आणि नियमांनुसार तसचं निर्धारित दरानुसार होत असल्याचं पियुष गोयल यांनी सांगितलं.

**संसद राज्यसभा**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनात राज्यसभेत काल शून्य प्रहर आणि प्रश्नोत्तराच्या तासाचं कामकाज सुरळीत पार पडलं. सकाळी कामकाजाला सुरुवात झाल्यानंतर विरोधकांनी 12 सदस्यांच्या निलंबनाच्या विषयावर चर्चेची मागणी केली. त्यावर हा विषय सभागृह नेते आणि विरोधी पक्षनेत्यांनी परस्पर चर्चेनं सोडवायचा सल्ला आपण दिला असल्याचं सभापती एम. वेंकय्या नायडू यांनी सांगितलं.

**साहित्य संमेलन**

विसावं शतक हे विज्ञानाचं शतक आहे; मात्र, विज्ञान साहित्याच्या बाततीत मराठीचं  अपूर्णत्व जाणवत असल्याची खंत; 94 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. जयंत नारळीकर यांनी काल व्यक्त केली. नाशिकच्या कुसुमाग्रज नगरीत काल 94व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं उद्घाटन झालं. डॉ नारळीकर प्रकृती अस्वास्थ्यामुळे संमेलनाला अनुपस्थित होते; दृकश्राव्य माध्यमातून त्यांनी उद्घाटन समारंभाला संबोधित केलं. इंग्रजी भाषा विज्ञानाची भाषा म्हणून मान्यता पावलेली भाषा आहे. जगभर ती वापरली जाते. तज्ञ लोकांच्या समित्या या इंग्रजी शब्दांचं कृत्रिम मराठी भाषांतर देऊ शकतील. पण सामान्य वाचक जर अशा शब्दांना स्वीकारू इच्छित असेल, तर ते शब्द वापरण्यावर बंदी का असावी, असा सवाल त्यांनी केला? विज्ञानकथांचे

प्रकार, दर्जा, विज्ञानकथांची समीक्षा, त्यांचं स्वतःचं विज्ञान कथालेखन याविषयी सविस्तर विवेचन नारळीकर यांनी केलं.ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील, ज्येष्ठ गीतकार जावेद अख्तर, मराठी भाषामंत्री सुभाष देसाई, स्वागताध्यक्ष छगन भुजबळ, साहित्य महामंडळाचे अध्यक्ष कौतिकराव ठाले-पाटील यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.तत्पूर्वी सकाळी टिळकवाडी इथल्या कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या कार्यालयातून निघालेल्या ग्रंथ दिंडीनं संमेलनाला प्रारंभ झाला. या ग्रंथदिंडीत शालेय विद्यार्थ्यांसह, विविध ढोल - लेझीम आणि नृत्य पथकं मोठ्या संख्येनं सहभागी झाली होती. नाशिकच्या सार्वजनिक वाचनालयात या ग्रंथदिडीचा समारोप झाला. त्यानंतर  ग्रंथ प्रदर्शनाचं तसंच मराठी भाषा दालनाचं उद्घाटनही करण्यात आलं. पुढचे दोन दिवस चालणाऱ्या या साहित्य उत्सवात अनेक विषयांवरील परिसंवाद, चर्चासत्र, कवी संमेलन असे अनेक कार्यक्रम होणार आहेत.

**एस टी - परब**

कामावर येऊ इच्छिणाऱ्या संपकरी एसटी कर्मचाऱ्यांना अडवणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती परिवहन मंत्री अनिल परब यांनी दिली आहे. सध्या राज्यभरात सुमारे साडेबाराशे गाड्यांची वाहतूक सुरू झाली असून 19 हजार कर्मचारी कामावर परतले आहेत. कामावर येणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कुठलंही बंधन नाही.गरजेनुसार त्यांना संरक्षण दिलं जात असल्याचंही त्यांनी सांगितलं.महिनाभरापासून सुरू असलेला एसटी कर्मचाऱ्यांचा संप बेकायदेशीर आहे. वेतनवाढीची घोषणा केल्यावरही अनेक कामगार रुजू झालेले नाहीत. यासंदर्भात काल  अधिकाऱ्यांची बैठक घेऊन परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन कर्मचाऱ्यांची अडवणूक करणाऱ्यांवर कारवाईचा निर्णय घेण्यात आल्याचं ते म्हणाले.एसटी ही राज्यात अत्यावश्यक सेवा आहे. त्यामुळं मेस्मा लागू करण्याचा निर्णयही राज्य सरकार घेऊ शकतं, असं त्यांनी स्पष्ट केलं.एसटी कर्मचाऱ्यांना दिलेली पगारवाढ कायमस्वरुपी असून याबाबतच्या  अफवांवर विश्वास ठेवू नये, असं परब यांनी स्पष्ट केलं.

**राज्य-कोविड आकडेवारी**

राज्यात काल कोरोनाचे 664 नवबाधित आढळून आले, तर 915 रुग्णांनी कोरोनावर मात केली. काल 16 कोरोना बाधितांच्या मृत्यूची नोंद झाली. राज्यातील उपचाराधीन रुग्णांची संख्या 7 हजार 132 इतकी होती. अनेक जिल्ह्यांमधून काल एकही नावबाधित आढळून आलेला नाही.  कोरोनाविषयक इतर बातम्या आपण कोरोना महाराष्ट्र या विशेष बातमीपत्रात ऐकू शकता.

**पुणे शाळा**

राज्यातील बहुतांश जिल्ह्यातील पहिली ते चौथीच्या वर्गांना प्रत्यक्ष प्रारंभ झाला असून  सोमवारपासून पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातही पहिली ते चौथीचे वर्ग भरणार आहेत. याबाबतचे आदेश पुणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागानं काल काढले. शासनाने घालून दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार शाळा सुरू कराव्यात असे निर्देश देण्यात आले आहेत.

**चंद्रपूर जीवाष्म**

इंट्रो

चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा तालुक्याच्या पश्चिमेला तूळणा गावाजवळून वर्धा नदी वाहते.या नदीपात्रात स्थानिक काही दिवसांपूर्वी शेतकऱ्यांना आणि काही शाळकरी मुलांना दगड गाळांचा थर आणि हाड सदृश्य खडक आढळला. याची माहिती भूशास्त्रज्ञ आणि संशोधक प्रा. सुरेश चोपणे यांना मिळाली, त्यानंतर त्यांनी या ठिकाणी जाऊन पाहणी केली.हे खडक नसून ते जीवाश्म असू शकतं असं प्रा. चोपणे यांचं म्हणण आहे, याविषयी बोलताना प्रा. चोपणे म्हणाले .........

**जे हाड आहे ते 4 फुट आणि 1 फुट मोठ असं ते हाड आहे. तिथे दुसर एक हाड आढळलं पण ती बरगडी होती आणि या सगळ्याचा आकार पाहताना टर जवळ जवळ हा 10 ते 15 फुट उंच प्राणी आहे आणि पंधरा ते वीस फुट असा लांब असा प्राणी असावा मी जल अधिकारी सर्वे ऑफ इंडिया चंद्रपूर आणि दिल्ली ला पत्र लिहील आहे की त्यांनी इथं येऊन सर्वेक्षण कराव आणि ते नेमका काळ काय आहे आणि कुठल्या प्रकारचा प्राणी आहे त्याचं प्रयोग शाळेत नेऊन अध्ययन कराव काही जे जीवाश्म आहेत त्या नदी मध्ये टाकल्याचं तिथल्य लोकांनी सांगितलं अशा प्रकारची हाड आहेत नागरिकांना सापडली टर त्यांनी त्वरित माझ्या सारख्या अभ्यासकाला द्या किव्हा भूशास्त्र विभागाला त्याची माहिती द्या**

**फडणवीस**

पुणे महापालिकेत पुन्हा भाजपची सत्ता आल्यावर पुण्याला देशातील सर्वोत्तम शहर बनवू असं विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी काल पुण्यात सांगितलं. पुणे शहर भाजपच्या नवीन कार्यालयाचं उद्घाटन काल फडणवीस यांच्या हस्ते झालं; त्यावेळी ते बोलत होते. कोवीडच्या काळात पुणे महापालिकेने उल्लेखनिय काम केल्याचं फडणवीस यावेळी म्हणाले. प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील, शहराध्यक्ष जगदीश मुळिक, महापौर मुरलीधर मोहोळ , स्थायी समितीचे अध्यक्ष हेमंत रासने आदी यावेळी उपस्थित होते.

**शेकटकर**

जगातील दहशतावादाचा वाढता धोका कमी करण्यासाठी  दहशतवाद्यांचे केंद्र असणाऱ्या पाकिस्तानला सामरिक हद्दीपासून तोडणे यावर पाश्चिमात्य देशांतही चर्चा आणि काम सुरू असून; येत्या काही वर्षांत पाकिस्तानचे पुन्हा विभाजन होणे अटळ आहे, असे मत निवृत्त लेफ्टनंट जनरल डॉ. डी. बी. शेकटकर  यांनी काल पुण्यात व्यक्त केले.1971 च्या भारत-पाकिस्तान युद्धातील  भारताच्या विजयाला यंदा पन्नास वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त पुणे महापालिका आणि कॉंग्रेसचे  गटनेते आबा बागुल यांच्या संकल्पनेतून 3 ते 16 डिसेंबर  या काळात ‘सुवर्ण विजय’ द्विसप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचं उद्घाटन करताना ते बोलत होते.  1965 आणि 1971 च्या युद्धात सहभागी टी-55 या प्रदर्शनीय रणगाड्याचे लोकार्पण शेकटकर यांच्या हस्ते  वसंतराव बागुल उद्यान इथं झाले.सैन्यदलाने पुणे महानगरपालिकेस भेट म्हणून दिलेला हा रणगाडा नागरिकांना बघण्यासाठी खुला असणार आहे.

**भंडारा तलवारबाजी प्रशिक्षक**

भंडारा जिल्ह्यामध्ये केंद्र शासनाच्या क्रीडा मंत्रालयाकडून खेलो इंडिया केंद्राअंतर्गत तलवारबाजी या क्रीडा प्रकाराचं  केंद्र मंजूर केलं आहे. त्या अनुषंगान तलवारबाजी खेळाच प्रशिक्षण देण्याकरिता प्रशिक्षक म्हणून काम करण्यास इच्छुक उमेदवारांनी अर्ज सादर करावे. त्यासाठी उमेदवार एन. आय .एस पदवीधर किंवा राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळलेले  खेळाडू असावेत.पात्र उमेदवारांना  6 डिसेंबर पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, भंडारा येथे अर्ज दाखल करता येतील. अस आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयान केल आहे.

**भाजप महावितरण ठिय्या आंदोलन**

गडचिरोली जिल्ह्यात बंद करण्यात आलेल्या कृषिपंपांच्या वीज जोडण्या तत्काळ सुरु कराव्यात,कृषिपंपांची सक्तीची वसुली थांबवावी इत्यादी मागण्यांसाठी काल आमदार कृष्णा गजबे यांच्या नेतृत्वात भाजप कार्यकर्ते आणि शेतकऱ्यांनी देसाईगंज येथील महावितरण कार्यालयापुढ ठिय्या आंदोलन केल.

**केदार**

राज्याच्या ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगार युवकांसह पशुपालक आणि शेतकऱ्यांना स्वयंरोजगाराचं साधन आणि शाश्वत अर्थार्जनाचा पर्याय उपलब्ध व्हावा म्हणून पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजनांसाठी अर्ज करण्याचं आवाहन राज्याचे पशुसंवर्धन आणि दुग्धविकास मंत्री सुनील केदार यांनी केलं आहे.त्यासाठीचे ऑनलाईन अर्ज https://ah.mahabms.com संकेतस्थलावर उपलब्ध आहेत.

**शेली पालन**

उस्मानाबाद इथं उद्या सकाळी दहा ते पाच या वेळात उस्मानाबादी शेळी महोत्सव आणि शेळी विकास परिषदेचे आयोजन करण्यात आल आहे. या वेळी शेळीपालन,दुग्धविकास याविषयी पशुवैद्यक तज्ञांचे मार्गदर्शन होणार असून शेळीपालना संदर्भात लागणाऱ्या वस्तूंची दालनं आणि शेळीपालन व्यवसाय संबंधी विविध माहिती देणारे स्टॉल्स लावण्यात येणार आहेत.

**क्रिकेट**

मुंबईत सुरु असलेल्या भारत आणि न्यूझीलंड संघादरम्यानच्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात काल यजमान भारतीय संघाने पहिल्या दिवसअखेर 4 बाद 221 धावा फटकावल्या. कालच्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा शतक झळकावणारा मयंक अग्रवाल आणि वृद्धीमान सहा धाव पट्टीवर होते. तत्पूर्वी भारतीय संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.

**पावसाच्या बातम्या**

राज्याच्या अनेक भागात कालही अवकाळी पावसानं हजेरी लावली. काल सकाळपासून वाशीम जिल्ह्याच्या विविध भागात पावसाची संततधार होती. ढगाळ वातावरण, धुकं आणि पावसामुळ वातावरणात गारवा निर्माण झाला असून या पावसामुळ पिकांच मोठ नुकसान होत आहे.धुळे जिल्ह्यात काल पावसान उघडीप दिली. मात्र साक्री तालुक्यात कमालीचा गारठा आणि पावसाची संततधार यामुळ दुधाळ लहान 193, तर मोठ्या दोन अशा 195 जनावरांचा मृत्यू झाला आहे.तर एका घराचं नुकसान झालं आहे.तसच साक्री, शिरपूर आणि धुळे तालुक्यातील अनेक गावांमध्ये काढणीला आलेला कांदा, कापूस, आणि हरभरा पिकांचं मोठं नुकसान झालं आहे. शेतकऱ्यांनी पंचनामे करुन नुकसान भरपाई देण्याची मागणी केली आहे.

**परभणी, पुर्णा सकाळी अवकाळी पावसान हजेरी**

जालना जिल्ह्यात गेल्या आठवडाभरापासून ढगाळ वातावरण असून, काही भागात हलका पाऊसही पडत आहे. याचा परिणाम जिल्ह्यातल्या सुमारे सात हजार हेक्टर क्षेत्रावरील द्राक्षबागांवर झाला आहे. शेतकऱ्यांना महागड्या

कीटकनाशकांची फवारणी करावी लागत असून, उत्पन्नात 50 टक्के घट होणार असल्याचं द्राक्ष बागायतदार शेतकरी सांगत आहेत.
नांदेड जिल्ह्यातही काल मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला.

**हवामान**
राज्यात काल अनेक ठिकाणी मध्यम ते जोरदार पावसाची नोंद झाली. पावसामुळे वातावरणातील गारठ्यात वाढ झाली आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, आजही  कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाउस पडण्याची शक्यता आहे, तर विदर्भात हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**